निर्भीड, निष्पक्ष आणि रोखठोक

तांदुळनगरी

ब्रेकिंग बातम्यांचे डिजिटल व्यासपीठ

दिनांक : 22 ऑगस्ट 2026, शनिवार

सायबर सुरक्षेसाठी बजाज नगर पोलीस ठाण्यात जनजागृती

तांडुळनगरी प्रतिनिधी

नागपूर, 21 ऑगस्ट : सायबर गुन्ह्यांपासून नागरिकांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या ‘सायबर शिका फॉर सायबर सुरक्षा’ उपक्रमांतर्गत बजाज नगर पोलीस ठाणे, नागपूर येथे सायबर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. क्विक हील फाउंडेशनच्या पुढाकाराने तसेच शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, नागपूर यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.



कार्यक्रमात शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्थेचे विद्यार्थी कुणाल मेश्राम व ऋतुजा गिरी यांनी सायबर गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी पोलीस अधिकारी, न्यायसहाय्यक तज्ज्ञ व कर्मचाऱ्यांना सायबर फसवणुकीचे प्रकार, ऑनलाइन व्यवहारातील धोके आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती देण्यात आली. संशयास्पद लिंकवर क्लिक करणे, बनावट फोन कॉल, ऑनलाइन फसवणूक, डिजिटल व्यवहारातील गैरप्रकार यापासून सुरक्षित राहण्यासाठी कोणती काळजी घ्यावी, याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

डिजिटल माध्यमांचा वापर वाढत असल्याने नागरिकांनी सायबर सुरक्षेबाबत सतर्क राहणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या जनजागृती कार्यक्रमामुळे बजाज नगर पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सायबर गुन्ह्यांच्या नव्या पद्धती आणि त्यापासून बचावाच्या उपाययोजनांची माहिती मिळाली. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

डिजिटल युगात सुरक्षित व जबाबदार नागरिक घडविण्याच्या उद्देशाने ‘सायबर शिका फॉर सायबर सुरक्षा’ उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृती सुरू ठेवण्यात येत आहे.

अशाच ब्रेकिंग बातम्या व ताज्या घडामोडी जाणून घेण्यासाठी आपया व्हॉट्सॲपमध्ये 7218031819 ॲड करा.